# कांकड आरती

प्रात:काळचा उपासनाक्रम (पहाटे ४.३० वाजता)

## (१) भूपाळी

जोडूनियां कर चरणीं ठेविला माथा ।
परिसावी विनंती माझी सद्गुरूनाथा[1] ॥१॥

असो नसो भाव आलों तुझिया ठाया ।
कृपादृष्टीं पाहें मजकडे सद्गुरूराया ॥२॥

अखंडित असावें ऐसे वाटतें पायीं ।
सांडूनी संकोच ठाव थोडासा देई ॥३॥

तुका म्हणे देवा माझी वेडीवांकुडी ।
नामें भवपाश हातीं आपुल्या तोडी ॥४॥